महाराष्ट्राचा मानबिंदू

# लोकमत

सातारा । मंगळवार

५.१०.२०२१

# कर्मवीर विद्यापीठ मंजुरी अंतिम टप्प्यात

## उदय सामंत : रयत शिक्षण संस्थेच्या १०२ व्या वर्धापन दिन कार्यक्रमात माहिती

लोकमत न्यूज नेटवर्क

सातारा : 'रयत शिक्षण संस्थेत सर्वसामान्यांची मुले शिकत आहेत. या शिक्षण संस्थेत काळाच्या गरजेनुसार कौशल्यपूर्ण शिक्षण देण्यासोबत शिक्षण पूर्ण झाल्यानंतर मुलांना रोजगारही उपलब्ध करुन दिला जात आहे. ही संस्था देशाचे भूषण आहे. रयतेच्या लेकराबाळांपर्यंत शिक्षणाची ज्ञानगंगा पोहोचविणाऱ्या कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या नावाने ग्रामीण विद्यापीठ मंजुरी अंतिम टप्प्यात आली आहे,' अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी दिली.

येथील यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स येथे रयत शिक्षण संस्थेचा १०२ वा वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात मंत्री सामंत बोलत होते. कार्यक्रमास आमदार बाळाराम पाटील, रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील, सचिव डॉ. विठ्ठल शिवणकर, मॅनेजिंग काऊन्सिल सदस्य रामशेठ ठाकूर, ऑडिटर प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे आदी उपस्थित होते.



सातारा येथे सोमवारी रयत शिक्षण संस्थेचा १०२ वा वर्धापन दिन कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी विचार व्यक्त केले. यावेळी डॉ. अनिल पाटील यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. (छाया : जावेद खान)

मंत्री सामंत म्हणाले, पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शिक्षण क्षेत्रातील काम अमूल्य आहे. या संस्थेत साडेचार लाखांहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. संस्थेचे काम आदर्शवत असून संस्थेसाठी शासनाकडून सर्व सहकार्य करण्यात येईल. देशातील विद्यार्थी बाहेरील देशातील विद्यापीठ पाहण्यासाठी, तेथे शिक्षण घेण्यासाठी जातात. भविष्यात रयत शिक्षण संस्था पाहण्यासाठी बाहेरील विद्यार्थी इथे येतील, तसेच मुंबई, पुणे येथील विद्यार्थी रयत शिक्षण संस्थेत शिक्षणासाठी येतील असा विश्वासही सामंत यांनी व्यक्त केला.

डॉ. अनिल पाटील म्हणाले, रयत संस्थेचा वर्धापनदिन समाजाने दिलेल्या योगदानाची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी साजरा केला जात आहे. संस्थेच्या जडण-घडणीत प्रबोधनकार ठाकरे यांचे मोलाचे योगदान राहिले आहे. संस्थेकडून काळाच्या गरजेनुसार मुलांना शिक्षण देत असल्याचे त्यांनी सांगितले. काळानुरूप शिक्षण क्षेत्रात होऊ घातलेल्या बदलांना आणि आव्हानांना सामोरे जाताना रयतने लवचीक भूमिका घेतल्याने स्पर्धेच्या युगात रयत टिकून राहिली. रयतच्या विकासाला शासनाचे पाठबळ मिळावे, अशी अपेक्षाही व्यक्त केली.

यावेळी सामंत यांच्या हस्ते रयत विज्ञान पत्रिकेचे प्रकाशन व ई-रयत ॲपचा शुभारंभ करण्यात आला. कार्यक्रमाचे कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. सविता मेनकुदळे यांनी केले. धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. प्रतिभा गायकवाड यांनी आभार मानले.

ग्रंथपाल
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा. जि. सातारा.

प्राचार्य
छत्रपती शिवाजी कॉलेज,
सातारा